लोकनेते डॉ.बाळासाहेब विखेपाटील (पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित)
प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कोल्हार
ता.राहाता जि.अहमदनगर पिन-४१३७१०
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम जून २०२० पासून
SYBA (G2)
Choice Based Cretit System [CBCS]
पहिले सत्र
आधुनिक मराठी साहित्यप्रकार कादंबरी (रारंगढांग)[CC-1C(3)]

प्रा.डॉ.राजेंद्र वडमारे
(मराठी विभाग प्रमुख)

---

## कादंबरीची वाचनप्रकिया

### ०१. प्रास्ताविक

कादंबरीचे वाड ;मयीन आकलन ही एक प्रकारची संमिश्र प्रक्रिया असते. त्यासाठी तिच्या घटकांचा विश्लेषक अभ्यास व संश्लेषक प्रतीती यांचा विचार करावा लागतो. त्याचे प्रकारविशिष्ट वेगळेपण जाणून घ्यावे लागते. लेखकाचा त्या प्रकारामागील निर्मितीचा संदर्भ , त्या साहित्यप्रकारातील एका महत्त्वाच्या लेखकाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख, त्या साहित्यप्रकाराच्या गतिविकासात्मक परंपरेचा संदर्भ , त्याचे एकूण वाड ;मयाच्या इतिहासाशी व त्याला जन्म देणाऱ्या भाषिक संस्कृतीशी असलेले नाते असे अनेक घटक आकलनासाठी महत्त्वाचे ठरत असतात. त्यामुळे त्या आकलनाला अर्थपूर्णता येते.

साहित्यकृतीच्या वाड ;मयीन आकलनाचे एक टोक तिच्या मूल्यमापनाची अपरिहार्यपणे जोडलेले असते. पण म्हणून वाड;मयीन आकलन म्हणजे त्यात साहित्यकृतीचे परीक्षण अथवा समीक्षण नव्हे. वाड ;मयीन आकलन म्हणजे आस्वाद. हा आस्वाद अधिक निर्भेळपणे घेता यावा एवढेच प्रस्तुत लेखाचे उद्दिष्ट आहे. हे आकलन सर्वच वाचकांचे सारखेच असेल असे नाही. वयोगट , आकलनक्षमता , अनुभवविश्व ,पूर्वज्ञान आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी आदी घटकांमुळे त्यात विशिष्टता असणे अभिप्रेत आहे.

कोणताही साहित्यप्रकार हा एकजिनसी नसतो. तो परिवर्तनशील व आविष्काराच्या अनेक शक्यता सामावून घेणारा असतो. त्यामुळे तत्त्वतः तरी त्याच्या आकलनप्रक्रियेत वाचकांच्या क्षमतेनुसार स्तरभेद अपरिहार्य असतात. प्रस्तुत लेखाच्या निमित्ताने कादंबरीच्या परिपूर्ण व वस्तुनिष्ठ आस्वादासाठी वाचकांना आकलनाच्या दृष्टीने किमान प्राथमिक आणि मूलभूत तत्त्वांचे नेमके ज्ञान होईल अशी अपेक्षा आहे.

### ०२. कादंबरीची वाचनप्रक्रिया

आकलन ही प्रामुख्याने वाचनावर आधारलेली प्रक्रिया आहे. वस्तुनिष्ठ आकलनासाठी योग्य वाचन कशा प्रकारचे असावे यासंदर्भात काही निकष सांगता येण्यासारखे आहेत.

**२.१. सूक्ष्म वाचन**

पूर्वग्रहमुक्त सूक्ष्म वाचन ही कोणत्याही साहित्यकृतीच्या वाचनाची पूर्वअट आहे. म्हणून कादंबरीचे वाचन करताना अशा प्रकारचे कोणतेही पूर्वग्रह मनात ठेवू नयेत. मुक्त मनाने अधिक निर्भेळपणे हे वाचन करावे. वाचन शक्यतो अत्यंत संथपणे व शक्य तितक्या सूक्ष्मपणे करावे. वाचनात चिंतनशीलता असावी. लेखनातील बारकावे जाणून घेण्याची मर्मदृष्टी ठेवावी. कादंबरीच्या वाचनासाठी वेळेची मर्यादा नसावी. आपल्या मर्जीप्रमाणे सोयीच्या वेळेनुसार शांतचित्ताने कादंबरीचे वाचन करावे. सूक्ष्म वाचनामुळे कादंबरीच्या आशयाचे आणि त्यामागे उभ्या असलेल्या गर्भित अर्थाचे विविधांगी कंगोरे स्पष्ट होण्यास मदत होते.

**२.२. प्रतिक्रियांच्या संक्षिप्त नोंदी**

वाचनामुळे कादंबरीतील घटना प्रसंगांची ओळख होते. या घटना प्रसंगांची शक्य ती सर्व अंगे , बाजू, प्रश्न लक्षात घेत असताना वाचकांच्याही मनात काही प्रतिक्रिया उमटत असतात. या प्रतिक्रियांची त्याच वेळी संक्षिप्त नोंद करणे गरजेचे असते. त्यामुळे नंतर विस्मरण होण्याची शक्यता संभवत नाही . म्हणून वाचताना मनात उमटणाऱ्या चांगल्या-वाईट अशा कोणत्याही प्रतिक्रिया तात्काळ नोंद करून ठेवाव्यात. कादंबरीच्या समग्र आकलनासाठी अशा प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

**२.३. भाषिक ज्ञान**

साहित्यकृती म्हणजे भाषिक संहिता असते. वाचकाला या भाषेचे परिपूर्ण ज्ञान अवगत असणे आवश्यक असते. सहित्याची भाषा , शब्दावली , वाक्यप्रकार , प्रतिमा , प्रतीके , अलंकार , म्हणी या संकल्पना व त्यामागील मथितार्थ वाचताना उलगडता आला पाहिजे. यासाठी आवश्यक तेथे भाषिक आकलनासाठी शब्दकोश , संदर्भग्रंथ, कोशादींची मदत घेणे उपयुक्त ठरते.

**२.४. पूरक अभ्यासक्षेत्रे**

साहित्यकृतीतील अनुभवांचे यथार्थ रूप कळण्यासाठी तिच्याशी अनुबंधित अशा अभ्यासक्षेत्रांची मदत घेतल्यास आपल्या ज्ञानाला अधिक बळकटी येते. त्यामुळे अशा वेगवेगळ्या पूरक अभ्यासक्षेत्रांचा धांडोळा घेणे केव्हाही चांगले असते. उदाहरणार्थ , कादंबरीत व्यक्तिरेखा असतात. त्यांच्या प्रेरणात्मक वर्तनाचा परिपाक म्हणून कृती प्रसंग घडतात. असे कृती प्रसंग व्यक्ती स्वभावाचे अविष्कारदर्शक असतात. त्यातील परस्परसंबंध तपासून पाहण्यासाठी फ्राईडचे मानसशास्त्र माहिती असेल , तर त्या पात्राच्या वर्तनाचा योग्य तो अन्वयार्थ लावण्यासाठी मदत होते. म्हणून कादंबरीच्या आकलनासाठी तिच्याशी अनुबंधित असलेली इतर शास्त्रे पूरक ठरतात. वाचकांनी ती ज्ञात करून घेणे , किमान तसा प्रयत्न करणे गरजेचे असते. त्यामुळे त्याच्या पूर्वज्ञानातही भर पडते.

**२.५. लेखकाच्या समग्र साहित्यकृतीचे वाचन**

परिपूर्ण आकलनासाठी त्या साहित्यकृतीच्या लेखकाचे सर्व साहित्य (असेल तर) वाचणे फायदेशीर ठरते. साहित्यकृतीतील लेखकाचा मूल्यगर्भित दृष्टिकोन स्पष्ट होण्याच्या दृष्टीने त्याच्या समग्र साहित्यकृतीचे वाचन फलद्रूप असते. त्यामुळे लेखकाचा त्या साहित्यकृतीमधील निर्मितीचा संदर्भ लक्षात येतो. हा संदर्भ कादंबरीच्या घटकांचे स्वरूप तपासताना व त्यातील सौंदर्य जाणून घेताना उपयुक्त ठरतो.

**२.६. साहित्यप्रकारांची संकल्पना**

साहित्यकृतीचे वाचन करत असताना तिच्या साहित्यप्रकारांची संकल्पना समजून घेणेही महत्त्वाचे असते. कारण प्रत्येक उपप्रकारांचे आपले असे एक मागणे असते आणि त्याआधारे तिच्यातील संदर्भ तपासून पाहणे अपेक्षित असते. उदाहरणार्थ, ऐतिहासिक कादंबरीचे आकलन करून घ्यायचे असेल तर ऐतिहासिक कादंबरीच्या संकल्पनेचे किमान पूर्वज्ञान असणे गरजेचे असते. भूतकाळ हा ऐतिहासिक कादंबरीचा विषय असतो. भूतकाळाकडे पाहण्याची एक नवी वृत्ती , एक नवा दृष्टिकोन तिच्यात अंतर्भूत असतो. भग्न किल्ले , भयानक शिक्षा , सूड, रहस्यमय व्यक्ती , वेषांतरे, पाठलाग ,चोरवाटा अशा ठरीव रचनातंत्राचा एक साठाही तिच्यात असतो. त्यामागे वाचकाला रोमांचक अनुभव देण्याचे कलात्मक उद्दिष्ट असते. त्याची ओळख असेल तर त्या साहित्यकृतीविषयीचे आकलन अधिक सुस्पष्ट व अर्थपूर्ण होते.

**२.७. साहित्यप्रकारांचा इतिहास**

साहित्यकृतीचे वाचन त्या साहित्यप्रकाराच्या गतिविकासात्मक परंपरेच्या संदर्भात करणे अपेक्षित असते. त्यामुळे साहित्यकृतीचे तिच्या इतिहासाशी कोणते नाते आहे याचा शोध घेणे सोपे होते. त्या साहित्यप्रकाराच्या नव्या दिशेने विस्तारित जाणाऱ्या कक्षाही त्यामुळे अधोरेखित होतात.

**२.८. समीक्षकांचे अभिप्राय**

उपलब्ध असतील तर त्या साहित्यकृतीविषयी इतर अभ्यासकांनी व्यक्त केलेले अभिप्राय देखील विचारात घ्यावेत. त्याचा साहित्यकृतीच्या मूल्यमापनाची कोणता संबंध आहे हे लक्षात घेऊन आपल्या मतांची यथार्थ मांडणी करण्याची मनोभूमिका तयार होते. त्यामुळे आपल्या आकलनाला निश्चित दिशा प्राप्त होते. त्याला अधिक बळकटी येते.

कोणत्याही साहित्यकृतीच्या योग्य आकलनासाठी तिचे असे परिपूर्ण वाचन करणे आवश्यक असते. सर्वच वाचकांना असे वाचन करणे शक्य नाही आणि त्यांच्याकडून तशी अपेक्षाही नाही. जाणकार वाचकांकडून मात्र अशा वाचनाची अपेक्षा ठेवणे यात काही गैर नाही. कादंबरीची श्रेष्ठता , लोकप्रियता, साहित्यिक मूल्ये यांच्या गुंतागुंतीचा विचार सुबोधपणे अभिव्यक्त होण्यासाठी अशा ससंदर्भ वाचनाची आवश्यकता असते.

परिपूर्ण वाचनामुळे त्या वाचकाचे आकलन त्याच्या ज्ञानक्षमतेच्या मर्यादे यथायोग्य असते. त्याचा आस्वाद प्रत्ययही नोंदी-टिपणाच्या रूपाने त्याच्या हाताशी असतो. त्यामुळे साहित्यप्रकाराची संकल्पना व इतिहास यांच्या आकलनातून हाताशी लागलेल्या निकषांचा पडताळा त्याला पाहता येतो. तसेच इतरांची समीक्षा व स्वत:चा आस्वाद यांचा ताळमेळ घालून, उणे अधिक करून त्या साहित्यकृतीकडे बघण्याची त्याची स्वतःची अशी नवी दृष्टी विकसित होते. त्याचे आकलन अधिक निर्दोष व अर्थपूर्ण बनते.

*****